वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी **(HSRP)** बसवितांना वाहन मालकांकडून वारंवार उपस्थित होणारे प्रश्न

अनु क्र.	प्रश्न	उत्तर
१.	कोणत्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी **(HSRP)** बसविणे आवश्यक आहे**?**	दि. ०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना HSRP बसविणे बंधनकारक आहे. दि. ०१.०४.२०१९ नंतर उत्पादित झालेल्या वाहनांना संबंधित वाहन वितरकामार्फत HSRP बसविली असल्यास पुन्हा HSRP बसविण्यासाठी अर्ज करणे आवश्यक नाही.
२.	**HSRP** बसविण्यासाठी वाहन मालकाने कोणत्या संकेतस्थळावर बुकिंग करावे **?**	परिवहन विभागाच्या http://www.transport.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर भेट देऊन HSRP ऑनलाईन बुकिंग लिंकवर नोंदणी करावी.
३.	वाहन मालकाने **HSRP** कोणत्या कंपनीकडून लावावी अथवा त्यासाठी नोंदणी कोठे करावी**?**	परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या 3 संस्थांची(vendor) माहिती खालीलप्रमाणे आहे. 1. M/s. Rosmerta Technologies Limited 2. M/s. Real Mazon India Ltd. 3. M/s. FTA HSRP Solutions Pvt. Ltd. परिवहन विभागाच्या www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.
४.	इतर कोणत्या कंपनीकडून **HSRP** बसविता येते का**?**	नाही. केवळ परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या संस्थांच्या मार्फतच HSRP लावणे बंधनकारक आहे.
५.	**HSRP** बसविण्यासाठी मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे आवश्यक आहे काय **?**	HSRP बसविण्यासाठी मोबाईक क्रमांक अद्ययावत करणे आवश्यक नाही. वाहन मालकांस कोणत्याही मोबाईल क्रमांकावरुन वाहनांवर HSRP बसविण्यासाठी अपॉईटमेंट घेता येते.
६.	**HSRP** चे शुल्काचा भरणा कसा करावा**?** रोख पैसे**(cash)** भरून **HSRP** बुकिंग करता येईल का**?**	वाहनावर HSRP बसविण्यासाठी शुल्काचा भरणा ऑनलाईन पद्धतीनेच UPI/Credit/Debit कार्डद्वारे करावा. रोखीने (Cash) पैसे भरण्याची सुविधा उपलब्ध नाही.

७.	एका जिल्हयातील वाहनांना इतर जिल्हयात /शहरात **HSRP** बसविता येते का **?**	एका जिल्हयातील वाहनांना सद्यस्थितीत वाहन मालक वास्तव्य करत असलेल्या इतर जिल्हयातील पिनकोड टाकून जवळच्या फिटमेंट केंद्राची निवड करून वाहनांवर HSRP बसविता येते. उदा. : आपले वाहन MH१२ येथे नोंदणीकृत असून सदर वाहन सद्यस्थितीत MH०१ यांच्या कार्यक्षेत्रात आहे. अशावेळी आपल्या वाहनास MH०१ येथे नियुक्त केलेल्या इतर अधिकृत कंपनीकडून(vendor) HSRP लावून मिळेल. यामध्ये आपल्या वास्तव्याचे / कामाचे ठिकाण इतर शहरात असल्यास तेथील पिनकोडनुसार आपणास फिटमेन्ट केंद्राची निवड करता येईल.
८.	प्रादेशिक परिवहन कार्यालय **(RTO)** कार्यालयाची निवड कशी करावी **?**	वाहन मालकांस त्यांचे वाहन सध्या ज्या कार्यालयात नोंदणीकृत आहे त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) ची निवड करावी लागेल. उदा. : एखादे वाहन MH१५ (नाशिक) येथे नोंदणी झाले असून सदर वाहनाचे हस्तांतरण MH३१ (नागपूर शहर) येथे झाले असल्यास सदर वाहन मालकाने HSRP बसविण्यासाठी MH३१ (नागपूर शहर) हे कार्यालय निवडावे.
९.	पिनकोडनुसार फिटमेंट केंद्राची निवड कशी करावी **?**	वाहन मालकास त्याचे वाहन महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही कार्यालयात नोंदणी झाले असले तरीही त्याला अपॉइंटमेंट घेताना सोयीस्कर व जवळच्या फिटमेन्ट केंद्राची पिनकोड नुसार निवड करता येईल.
१०.	जुनी प्लेट काढण्यासाठी वेगळे शुल्क दयावे लागेल काय **?**	वाहनांची जुनी प्लेट काढण्याकरिता कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही.
११.	**HSRP** ब्रॅकेट बसविण्यासाठी वेगळे शुल्क दयावे लागेल काय **?**	HSRP ब्रॅकेट लावणे बंधनकारक नाही, त्यासाठी अधिकृत फिटमेन्ट केंद्र चालक कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करू शकत नाही.
१२.	माझ्या वाहनांना **HSRP** घरी बसून मिळेल काय**?** मिळाल्यास त्यासाठी किती शुल्क द्यावे लागेल **?**	होय. त्यासाठी नेमण्यात आलेल्या कंपनीकडून विहित अतिरिक्त शुल्काचा भरणा करावा लागेल. अधिकृत केंद्रात HSRP लावल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क लागणार नाही.
१३.	सोसायटीमध्ये किंवा कंपनीच्या परिसरात एका ठिकाणी **HSRP** बसवण्याची सुविधा आहे काय **?**	सोसायटीमध्ये किंवा एका ठिकाणी 25 किंवा 25 पेक्षा जास्त वाहनानकरिता HSRP बसवण्याची नोंदणी केल्यास होम फिटमेंट शुल्क न आकारता HSRP बसवण्यात येईल.
१४.	एका ठिकाणी **HSRP** बसवण्यासाठी अपॉइंटमेंट घेतले असून माझे वाहन इतर ठिकाणी आहे**.** तरी यासाठी **HSRP** फिटमेन्ट केंद्र बदलून देण्याची सुविधा आहे काय **?**	एकदा अपॉइंटमेंट घेतल्यानंतर त्यामध्ये बदल करता येत नाही. तथापि अपॉइंटमेंट घेण्यापूर्वी वाहन मालकास त्याचे इतर शहरातील फिटमेन्ट केंद्र निवडण्याची मुभा राहील.

<table>
<tr><td>१५.</td><td>HSRP वितरक किती प्लेट व कलर कोड स्टीकर लावून देईल ?</td><td>वितरकास ठरवून दिलेल्या शुल्कामध्ये प्रत्येक वाहनास मागे एक व पुढे एक अशा दोन HSRP प्लेट व कलर कोड स्टीकर (तीनचाकी/चारचाकी) वाहनांस लावून देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>१६.</td><td>परिवहन विभागाच्या वेबसाईटवर अपॉईंटमेंट घेताना अडचणी येत असल्यास काय करावे ?</td><td>अपॉईटमेंट घेताना अडचण येत असल्यास परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या कंपनीच्या खालील तक्रार निवारण प्रणालीवर (Grievance portal) संपर्क साधावा.
<table>
<tr><th>Agency Name</th><th>Customer Care Number & Email Id</th></tr>
<tr><td>M/s. Rosmerta Technologies Limited</td><td>7836888822
customer.support@ mhhsrp.com
complaint@mhhsrp.com</td></tr>
<tr><td>M/s. Real Mazon India Ltd</td><td>+91-120-6457502
+91-120-6457503,
realmazonmhhsrp@ outlook.com,
atulrmhsrp@gmail.com</td></tr>
<tr><td>M/s. FTA HSRP Solutions Pvt. Ltd.</td><td>8799576138
9305387622
customer.care@ maharashtrahsrp.com.
avinash.rathod@hsrp.in
ftamhgrievance@hsrp.in</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

१७.	वाहन **4.0** प्रणाली बंद झाल्यास काय करावे **?**	वाहन 4.0 प्रणाली राष्ट्रीय सुचना केंद्र (NIC) द्वारे विकसित करण्यात आली आहे यामध्ये तांत्रिक अडचण आल्यास अपॉईंटमेंट मिळत नाही यासाठी थोडया वेळानंतर प्रयत्न करणे आवश्यक राहील.
१८.	नेटवर्क एरर आल्यास काय करावे **?**	सदर बाब तांत्रिक असल्याने इंटरनेट/ नेटवर्क असलेल्या ठिकाणीच अपाइंटमेंट घेण्यासाठी प्रयत्न करावा.
१९.	परिवहन आयुक्त यांच्या वेबसाईट लॉगीनमध्ये अडचण आल्यास काय करावे **?**	परिवहन आयुक्त यांची वेबसाईट लॉगीन करताना अडचण आल्यास थोड्या वेळाने पुन्हा लॉगीनसाठी प्रयत्न करावा.
२०.	एकदा घेतलेल्या अपॉईंटमेंट नंतर वाहन मालकास नवीन अपॉईटमेंट घ्यायची असल्यास **(Reschedule)** काय करावे **?**	अपॉईंटमेंट नंतर पुन:श्च वाहन मालकास अपॉईटमेंट (Reschedule) करायची असल्यास परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या संबंधित एजन्सीच्या पोर्टलवरुन Reschedule/replacement/ Re-order appointment या टॅबवर जाऊन पुन्हा अपॉईंटमेंट घ्यावी.
२१.	अपॉईटमेंटच्या दिवशी **Vendor** कडून मेसेज आला नसल्यास काय करावे **?**	अपॉईटमेंटच्या दिवशी कंपनीकडून (Vendor) मेसेज आला नसल्यास , परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या कंपनीच्या तक्रार निवारण प्रणालीवर (Grievance portal) तक्रार नोंदवावी.
२२.	अपॉईंटमेंटचा दिवशी वाहनांवर **HSRP** न बसविल्यास कोठे तक्रार करावी **?**	यासाठी परिवहन विभागाचा ई- मेल hsrpcomplaint.tco@gmail.com वर तक्रार नोंदवावी.
२३.	फिटमेंट केंद्र बंद असल्यास कोठे तक्रार करावी **?**	
२४.	वाहन धारकांकडून **HSRP** शुल्क भरल्यानंतरही **HSRP** पाटी बसवून मिळाली नसल्यास काय करावे **?**	
२५.	वाहनांवर **HSRP** बसविण्याकरिता गेल्यानंतर फिटमेंट केंद्रावर वेळ लागत असल्यास काय करावे **?**	

२६.	फिटमेंट केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्काची मागणी होत असल्यास काय करावे **?**	यासाठी परिवहन विभागाचा ई- मेल hsrpcomplaint.tco@gmail.com वर तक्रार नोंदवावी.
२७.	**Vendor** किंवा उत्पादकांकडून तयार करण्यात आलेल्या तक्रार निवारण प्रणाली **(Grievance Portal)** च्या मेलवर उत्तर न देणे व फोनवर उडवाउडवीचे उत्तरे येत असल्यास काय करावे **?**	
२८.	फिटमेंट केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून चुकीची नंबर प्लेट अथवा स्टीकर लावले गेल्यास काय करावे **?**	फिटमेंट केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून चुकीची नंबर प्लेट लावली गेल्यास परिवहन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या कंपनीच्या तक्रार निवारण प्रणालीवर (Grievance portal) तक्रार नोंदवावी. नवीन HSRP विनाशुल्क बसवून दिली जाईल.